# रे.दि.मु.नं. १९०/२०११ नि. ५ वरील आदेश

(पारीत दि.०३/११/२०११)

लक्ष्मण बाबू सांळुखे मयत वारस ...... **वादी.**
दिनकर लक्ष्मण सांळुखे

//**विरुध्द//**

श्री. रंगराव पांडूरंग हजारे, वगैरे ...... **प्रतिवादी.**

१. वादीनी सदर अर्ज **"दिवाणी प्रकिया संहितेचे आदेश—३९ नियम—१ व २"** अंतर्गत प्रतिवादी क्रमांक १ ते ४ विरुध्द तूर्तास मनाई ताकीदी मिळण्याकरीता दाखल केला आहे. याउलट, प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी निशाणी १७ प्रमाणे दाव्यास कैफियत व सदर अर्जास लेखी—उत्तर दाखल करुन सदर अर्जामधील उपरोक्त नमुद संपुर्ण कथनाचे खंडन केले आहे. प्रतिवादी क्र. ४ यांचेविरूध्द सदर अर्ज एकतर्फा चालविण्यात आला आहे.

२. वादी व प्रतिवादींचे वरील विरोधाभाशी कथन व दस्तावेजावरील उपलब्ध साक्ष—पुराव्यावरुन मी खालील मुद्दे तयार करुन त्यांचे कारणमीमांसेसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| <u>**मुद्दे**</u> | <u>**निष्कर्ष**</u> |
|---|---|
| १) वादीनी सिध्द केले आहे काय की, त्यांचा दावा प्रथमदर्शनी आहे? | ... **होकारार्थी.** |

२) वादीनी सिध्द केले आहे काय की, दाव्याचा तूळ/कल त्यांच्याकडे आहे? ...**होकारार्थी.**

३) वादीनी सिध्द केले आहे काय की, त्यांना तूर्तास मनाई ताकीदी न दिल्यास त्यांचे पैशाने भरून न येणारे नुकसान होईल? ...**होकारार्थी.**

४) कोणता आदेश? **अंतिम आदेशाप्रमाणे.**

## <u>निष्कर्षाची कारणमीमांसा</u>

३.  वादीचे तज्ञ वकील साहेब, श्री. एम.टी. देसाई व प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचे तज्ञ वकील साहेब, श्री. आर.पी.गांधी यांना मी विस्तृतपणे ऐकून घेतले तसेच संपुर्ण दस्तावेजाचे सुक्ष्मपणे अवलोकन केले आहे.

## <u>मुद्दा क्र. १ ते ३ बाबत</u> :—

४.  उपरोक्त नमुद सर्व मुदद्े एकमेकाशी निगडीत असल्यामुळे सदर सर्व मुद्यांच्या निष्कर्षाची कारणमिंमासा मी एकत्रितरित्या देत आहे. सर्वप्रथम मी येथे नमुद करू इच्छितो की, दावा मिळकत १अ व १ब यांचे विस्तृत वर्णन दावा परिच्छेद क्र.१ व दावा नकाशामध्ये दिलेले असुन ते खालीलप्रमाणे आहे.

१अ) जिल्हा सातारा पैकी तालुका कराड पैकी मौजे वराडे

येथील रानची शेतजमीन खालीलप्रमाणे.

| अ.नंबर | भुमापन क्र. | क्षेत्र | आकार | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | हे—आर | रू — पैसे, | |
| १. | ४९३ | ०—३६ | २—७८ | संपुर्ण |

येणेप्रमाणे हिश्यांची व क्षेत्रांची संपुर्ण जमीन त्यामधील वस्तुसुध्दा.

१ब) जिल्हा सातारा पैकी तालुका कराड पैकी मौजे वराडे येथील गट नंबर ४९० या हे ०—०२ आर क्षेत्रांचे मिळकतीमधील पश्चिम हद्दीवरील पुर्व पश्चिम दहा फुट रूंदीची व दक्षिण उत्तर गट नंबर ४९० चे पुर्ण लांबीची मिळकत यांसी चुर्त:सिमा—

पुर्वेस :— गट नंबर ४९० मधील राहिलेली मिळकत,

दक्षिणेस :— वादींची दावा कलम १अ मध्ये नमुद केलेली गट नंबर ४९३ ची मिळकत,

पश्चिमेस :— प्रतिवादीची गट नंबर ४९१ ची मिळकत,

उत्तरेस :— रस्ता,

येणेप्रमाणे चर्तु:सिमापुर्वक मिळकत त्यामधील तंदगभुत वस्तुसुध्दा.

५. दस्तावेजावरील उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरून स्पष्ट होते की, वादी दिनकर सांळुखेचे वडील लक्ष्मण सांळुखे हे दावा मिळकत १अ चे मालक व कब्जेवहिवाटदार होते. वादी दिनकरचे वडील लक्ष्मण सांळुखेचे निधन झाले असुन दावा मिळकत १अ चे ७ / १२ उताऱ्यावरून

त्यांचे नाव कमी करून वादी व इतर वारसांच्या नावाची नोंद घेतलेली नाही. दावा मिळकत १अ चे रेकॉर्डसदरी सद्य:स्थितीला सुद्धा मृतक लक्ष्मण सांळुखेचे नावाची नोंद आहे. प्रतिवादीनी नाकारले नाही की, वादी दिनकर सांळुखे हे मृतक लक्ष्मण सांळुखेचे वारस व मुलगा आहे. म्हणून वादी दिनकर सांळुखे हे लक्ष्मण सांळुखेचे कायदेशीर वारस या नात्याने दावा मिळकत १अ चे सहमालक व कब्जेदार असल्याचे म्हणता येईल. वादी हे दावा मिळकतीचे सहमालक असल्यामुळे ते स्वत:करीता व इतर हितसंबधीताकरीता दावा मिळकतीचे संरक्षणाकरीता निरंतराचे मनाई ताकीदीचा दावा दाखल करू शकतात. म्हणून दावा मिळकत १अ चे संरक्षणाकरीता वादीला सदर दावा दाखल करण्याचा अधिकार असल्याचे म्हणता येईल.

६. दावा मिळकत १ब मध्ये वादीचा नियमीत दि. मु. क्र. ३०६/९३ मधील हुकूमनाम्याप्रमाणे मालकी हक्काने व वहिवाटीचा रस्ता असल्याचे दस्तावेजावरील उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरून दिसून येते. सदर हुकूमनाम्याची प्रत दस्तावेजावर उपलब्ध आहे. सदर नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३०६/९३ मध्ये गट क्रमांक ४९० चे सहमालकानी वादीचे वडीलांसोबत समझोता करून हुकूमनामा पारीत करून घेतला होता. सदर हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकत १ब वादी व त्यांचे वडीलांना ये जा करण्यासाठी तसेच सामान ने आण करण्याकरीता मालकी हक्काने दिलेली आहे. त्याप्रमाणे वादी व त्यांचे वडील हे दावा मिळकत १अ मधुन उत्तरेकडील ग्रामपंचायत रस्त्यावर जाण्याकरीता दावा मिळकत १ब मधील

वहिवाटी रस्त्याच्या उपयोग करीत होते व आहेत. दावा मिळकत १अ व १ब मध्ये प्रतिवादींचा कोणताही हक्क व अधिकार नाही. प्रतिवादी हे गट क्रमांक ४९१ चे मालक व कब्जेवहिवाटदार असुन त्यामध्ये त्यांनी घर बांधले आहे. प्रतिवादींचा गट क्रमांक ४९१ हा दावा नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे दावा मिळकत १अ व १ब ला लागुन आहे.

७. दस्तावेजाचे अवलोकनावरून स्पष्ट होते की, वादी व प्रतिवादीमध्ये उपरोक्त नमुद मिळकतीच्या हद्दीबाबत वाद आहे. नियमीत दिवाणी मु. क्र. ३०६/९३ मध्ये प्रतिवादी हे पक्षकार नसले तरीही त्यामधील हुकूमनामा गट क्रमांक ४९० दावा मिळकत १ब बाबत असुन त्याचा प्रतिवादींच्या मिळकतीशी काहीही संबंध नाही. म्हणून उपरोक्त नमुद नियमीत दि. मु. क्र. ३०६/९३ मध्ये प्रतिवादी हे पक्षकार नसले तरीही त्यामधील हुकूमनाम्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी त्यांचे गट क्रमांक ४९१ मध्ये हद्दीवर कोणतीही जागा न सोडता घराचे बांधकाम केले आहे. याउलट, प्रतिवादींनी कथन केले की, त्यांनी त्यांचे गट क्र.४९१ च्या हद्दीवर जागा सोडून घराचे बांधकाम केले आहे. प्रतिवादींनी त्यांचे मिळकतीमध्ये जागा सोडून बांधकाम केले किंवा नाही ही बाब दस्तावेजावरील साक्षीपुराव्यावरून स्पष्ट होत नाही. प्रतिवादींनी त्यांच्या मिळकतीमध्ये चारही बाजुनी जागा सोडून बांधकाम केले किंवा नाही तसेच दावा मिळकत १अ व १ब ची हद्दी निश्चीत करण्याकरीता तज्ञ व्यक्ती भुमापकाकडून उपरोक्त नमुद सर्व मिळकतीची संयुक्तीक मोजणी करणे आवश्यक आहे. सदर संयुक्तीक

मोजणी केल्याशिवाय उपरोक्त नमुद मिळकतीबाबत असलेला हद्दीचा वाद निकाली काढता येणार नाही.

८. वादी व प्रतिवादींनी उपरोक्त नमुद मिळकतीची संयुक्तीक मोजणी केल्याचे दस्तावेजावरून दिसून येत नाही. प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकत १अ मधील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करून दावा मिळकत १ब मधील वहिवाटीस सुद्धा हरकत अडथळा निर्माण केला आहे. दावा मिळकत १अ व १ब मध्ये प्रतिवादींचा कोणताही हक्क व अधिकार नसल्यामुळे त्यामध्ये हरकत अडथळा निर्माण करण्याचा प्रतिवादींना कोणताही अधिकार नाही. प्रतिवादींचा वादीच्या दावा मिळकत १अ व १ब चे हद्दीबाबत वाद असल्यास त्यांनी सदर वाद निकाली काढण्याकरीत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे भुमापकाकडून मोजणी करून घेवून हद्दी निश्चीत करून घेणे आवश्यक आहे. सदर हद्दी निश्चीत केल्यानंतरच प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकत १ब मधील वहिवाटी रस्ता त्यांच्या गट क्र. ४९० मधुन नसुन गट क्रमांक ४९१ मधुन असल्याचा आक्षेप घेऊ शकतात. गट क्रमांक ४९० चे सह मालकानी वादी व त्यांचे वडीलांना त्यांचे गट क्रमांक ४९० मधुन दावा मिळकत १ब मधून जाण्या येण्याचा वहिवाटी रस्ता दिलेला आहे.

९. सदर दावा मिळकत १ब मधील वहिवाटी रस्ता प्रतिवादींचे गट क्रमांक ४९१ मधील जागेमधून असल्याची बाब मोजणीशिवाय निश्चीत करता येणार नाही. म्हणून वादीचा दावा मिळकत १ब मधुन म्हणजेच गट

क्रमांक ४९० मधुन दाव्याचे नकाशात दर्शविल्याप्रमाणे जाण्या—येण्याचा वहिवाटी रस्ता असुन सदर मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही हक्क व हितसंबंध नसल्याचे म्हणता येईल. वास्तविकतेमध्ये प्रतिवादींच्या गट क्रमांक ४९१ या मिळकतीच्या हद्‌दी तसेच दावा मिळकत १अ व १ब च्या हद्‌दीबाबत वाद असल्यास सदर वाद प्रतिवादींनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करून निकाली काढणे अपेक्षीत आहे. सदर हद्‌दीचा वाद निर्माण करण्याचा प्रतिवादींना अधिकार असला तरीही ते सदर वाद केवळ हद्‌दी निश्चीत करून कायदेशीर मार्गानेच मिटवू शकतील. परंतु प्रतिवादी हे उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे हद्‌दीचा वाद निर्माण करून वादीच्या दावा मिळकत १अ व १ब मधील कब्जेवहिवाट व जाण्या—येण्याच्या मार्गामध्ये अनाधिकाराने हरकत अडथळा निर्माण करू शकणार नाहीत. म्हणून कायदेशीर मार्गाचा अवलंब करून उपरोक्त नमुद सर्व मिळकतीच्या हद्‌दी निश्चीत करेपर्यंत प्रतिवादींनी अनाधिकाराने वादीच्या दावा मिळकत १अ व १ब मधील कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा निर्माण करू नये अशी तुर्तास मनाई ताकीदीचा आदेश पारीत करणे संयुक्तीक व न्यायोचीत होईल.

१०. यामुळे सदर अर्जाकरीता वादीचा दावा प्रथमदर्शनी असल्याचे म्हणता येईल. दाव्याचा तूळ/कल नेहमी प्रथमदर्शनी दाव्याकडे असतो. वादीचा दावा प्रथम दर्शनी असल्यामुळे दाव्याचा कल/तूळ सूध्दा त्यांच्याकडे असल्याचे म्हणता येईल. वादीला तुर्तास मनाई ताकीदी न दिल्यास प्रतिवादी अनाधिकाराने त्यांचे दावा मिळकत १ अ व १ब मधील

कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करतील. त्यामुळे निश्चीतच वादीना दावा मिळकत १अ व १ब चा उपभोग घेता येत नसल्यामुळे त्यांचे पैशाने भरून न येणारे नुकसान होईल. याउलट, प्रतिवादींचा दावा मिळकत १अ व १ब मध्ये कोणताही हक्क व हितसंबंध नसल्यामुळे त्यांच्याविरूध्द तुर्तास मनाई ताकीदी दिल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेही प्रतिवादींना कायदेशीर मार्गाचा अवलंब करून उपरोक्त नमुद सर्व मिळकतीच्या हद्दी निश्चीत करून उपरोक्त नमुद हद्दीचा वाद निकाली काढून मिळण्याचा व तसा दिलासा मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे सुद्धा सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता वरील कारणमीमांसा लक्षात घेता मी **मुददा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबत** :—

११. वरील कारणमीमांसा लक्षात घेऊन न्यायोचित होईल असा मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अर्ज नि.क्र.५ खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. सर्व प्रतिवादी, त्यांचे नातेवाईक, नोकर, एजंट, मित्र व त्यांच्यावतीने कार्य करणाऱ्या इतर सर्व व्यक्तींना तूर्तास मनाई ताकीदीच्या आदेशाद्वारे

सदर दावा अंतिमत: निकाली निघेपर्यत तूर्तास मनाई करण्यात येते की, त्यांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करून हद्‌दी निश्चीत करेपर्यंत दावा मिळकत १अ व १ब मधील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा निर्माण करू नये.

३. सर्व प्रतिवादींनी वादीला सदर अर्जाचा खर्च रू ५००/— दयावा.

**ठिकाण**:—कराड (राजेश म. कपाटे)
**दिनांक :—०३**/११/२०११ **५वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**तथा न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, कराड.**

(युवराज शं. पाटील)
लघुलेखक (निम्नश्रेणी)